## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक ४२२००३

**विषय— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी )व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च—एप्रिल २०२२ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...**

# !! प्रकटन !!

मार्च—एप्रिल **२०२२** मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातुर व कोंकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणा—या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.१२वी)** व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र **(इ.१०वी)** लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | शुक्रवार दि. ०४ मार्च२०२२ ते बुधवार दि. ३० मार्च २०२२ |
| २ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | मंगळवार दि. १५ मार्च २०२२ ते सोमवार दि.०४ एप्रिल २०२२ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. **२१ डिसेंबर २०२१** पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरुन परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून प्रसारित झालेले वेळापत्रक ग्राहय धरु नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

क्र.नाविमं/माध्यमिक ब १/ २०४६
नाशिक ४२२००३
दिनांक २३/१२/२०२१

मे